महानगरपालिकांच्या वार्षिक लेख्यांचे अंतर्गत लेखापरीक्षकांकडून नियमित लेखापरीक्षण व असे लेखे स्थायी समितीसमोर सादर करणेबाबत ....

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- लोलेस-२०१६/प्र.क्र. ०३/नवि-३१
मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक - २२ जानेवारी, २०१६

<u>परिपत्रक</u>

महानगरपालिकांचे वार्षिक लेखे तयार झाल्यानंतर अंतर्गत लेखापरीक्षकांनी सदर लेख्यांची तपसणी करावी व नंतर सदर लेखे महानगरपालिकेच्या स्थायी समितीस सादर करण्यात यावे अशी तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये करण्यात आलेली आहे. तरीही महानगरपालिकांचे लेखे अंतर्गत लेखापरीक्षकांनी नियमितपणे तपासणे व ते लेखे स्थायी समितीसमोर सादर करणे यामध्ये प्रलंबिततेचे प्रमाण जास्त असल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या स्थानिक संस्था अहवालातून वारंवार निदर्शनास आणून दिले आहे. तसेच संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनीही सदर लेखे स्थायी समितीसमोर ठेवण्याकरिता निश्चित कालमर्यादा असावी असे अभिप्राय नोंदविलेले आहेत.

२. उपरोक्त परिच्छेदात विषद केलेल्या परिस्थितीत महानगरपालिकांच्या लेख्यांचे अंतर्गत लेखापरीक्षकांकडून केले जाणारे लेखापरीक्षण व सदर लेखे स्थायी समितीस सादर करण्यासंदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील खंड ९४, १०५ व १०६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

- महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांकडून (Municipal Chief Auditor) महानगरपालिकांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण दर वर्षी नियमितपणे पूर्ण केले जाईल याची दक्षता घ्यावी.
- लेखापरीक्षण झालेले लेखे प्रत्येक वर्षी दिनांक ३० जून पूर्वी स्थायी समितीसमोर सादर केले जातील याची सर्व महानगरपालिका आयुक्तांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी.
- तसेच यापूर्वीच्या वर्षांचे लेखे स्थायी समितीस सादर करण्याचे राहिले असल्यास ते ३० जून, २०१६ पूर्वी स्थायी समितीसमोर सादर केले जातील याची सर्च महानगरपालिका आयुक्तांनी दक्षता घ्यावी.

३. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१६०१२२१५४८२८३७२५ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=URBAN DEVELOPMENT DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2016.01.22 15:49:46 +05'30'

(पां. जो. जाधव)
सहसचिव, नगर विकास विभाग

प्रति,

१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. नगर विकास विभागातील सर्व सहसचिव /उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
३. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
४. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
५. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
५. निवड नस्ती (नवि-३१)